# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Senior citizens**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **09/04/2023**

**Brief of the work done :-**

पोलीस असल्याची बतावणी करून वृद्धास लुटणारे 02 तोतया पो.स्टे. रिसोड पोलिसांच्या ताब्यात.

## तोतया पोलीस अधिकारी व कर्मचारी बनुन वृद्ध व्यक्तिला लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना रंगेहात पकडले

देशोन्नती वृत्तसंकलन...

**रिसोड** ■ तोतया पोलीस अधिकारी व कर्मचारी बनुन एका वृद्ध व्यक्तिला लुटण्याचा प्रयत्न करत असताना दोघांना रंगेहात पकडण्यात रिसोड पोलिसांना यश आले. अटक करण्यात आलेले दोघेही कर्नाटक राज्यातील बिदर सिदडी येथील असुन मुजाहिद अली मिस्कीन अली वय ३२ आणि सैफ खान युसूफ खान वय २१ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. मात्र वेळीच अशा टोळयांना आळा घालणे अत्यंत गरजेचे आहे. अशा मागण्याही केल्या जात आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, रिसोड शहरातील दिनकरराव भिकाजी सानप हे काही कामानिमित्त सिव्हिल लाईन रस्त्यावरून जात असताना श्री शिवाजी विद्यालयासमोर मोटारसायकलवरून दोन युवक आले व त्यांनी पोलीस असल्याचे सांगितले. नकली कार्ड दाखवल्यानंतर त्याच्या हातातील अंगठी काढायला सांगितली.ते पाहून तिथून जाणारे दुसरे प्राध्यापकानी तात्काळ धावत आले आणि पोलिसांना कळवले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून या बनावट पोलिसांना पकडले. यामध्ये एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला, काही वेळाने पोलिसांनी त्याचा शोध घेत बसस्थानकातून त्याला बसमधून ताब्यात घेतले. कसून विचारपूस केली असता, त्यानी दोघे सोबत असण्याची आणि अशा घटनांमध्ये सहभागी असल्याची कबुली केली. ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी रतन बावस्कर, रवी अढागळे यांनी कारवाई केली.(ता.प्र.)